स्वाभिमानी दिवाळी अंकासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा) : ऑक्टोबरपर्यंत खासदार राजू शेट्टी जनसंपर्क कार्यालय, पोलिस स्टेशनच्या समोर, ९ वी गल्ली, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील पत्त्यावर पाठवावे. संपर्कासाठी फोन : (०२३२२) २२४३४७, मोबा. ९५०२३२५६३५ जाहिरातदारांनी आपला जाहीर आशय हा विषय असून सदर दिवाळी अंकासाठी जाहिरातदार व लेखकांनी १५ ऑक्टोबरपर्यंत पोहोचेल याची दक्षता घ्यावी.



वर्ष ५ ॥ अंक २० ॥ १ ऑक्टोबर २०१० ॥ किंमत ५ रुपये ॥ पाने १२
RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11
स्वाभिमानी विचार
संपादक : खासदार राजू शेट्टी
तुकडेबंदी संघटना

ऊस दरावरून भडका उडणार

जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): चालू गळीत हंगामामध्ये शासनाने प्रतिटनाप्रमाणे १३१.१२ रुपये जाहीर केले असून हा दर स्वाभिमानी शेतकरी संघटनेस कदापि मान्य नाही. दि. १५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या स्वाभिमानीच्या ऊस परिषदेनंतर ऊस आंदोलनाचा संपूर्ण महाराष्ट्रभर भडका उडणार आहे. ऊस आंदोलनाची व्याप्ती राज्यभर करण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी मुक्ताचा विदर्भ व मराठवाड्याचा दौरा केला आहे.

कृषीमंत्री शरद पवार यांनी देशात जादा ऊस असून यावर्षी ऊस शिल्लक राहिल अशी भिती घातली आहे. मात्र ऊस अजिबात जादा नाही. करना उसाला फारशी वाढ देखील नाही. तसेच बंद असलेला ४० साखर कारखान्यांची धुराडी या गळीत हंगामात पेटणार आहेत. त्यामुळे उसाचे एक कांडेही शिल्लक राहणार नाही, असे खासदार राजू शेट्टी यांनी मुक्तरेच सांगितले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने अद्याप ऊस दराची मागणी केलेली नाही. साधारण १५ ऑक्टोबरच्या ऊस परिषदेत स्वाभिमानी शेतकरी संघटना दराची मागणी करणार आहे. ऊस परिषदेस हजारो कार्यकर्ते उपस्थित राहतील.

साखरेचा कोटा शिल्लक ठेवण्याची मर्यादा वाढविली

कोल्हापूर (प्रतिनिधी): केंद्र सरकारने साखरेचा कोटा शिलक ठेवण्याची मर्यादा असून, आता मोठ्या कंपन्यांना पंधरा दिवसांऐवजी नव्वद दिवस साठा करता येणार असल्याने साखरेचे भाव स्थिर होण्यास मदत होणार आहे. व्यापाऱ्यांकडील साठ्याची मर्यादा वाढविली, तर भाव काही प्रमाणात वाढण्यास मदत होईल. ।

साखरेचे खुल्या बाजारातील किरकोळीचे भाव ४५ रूपयांच्या पुढे गेल्यानंतर सरकारने मोठ्या कंपन्यांना साखर साठविता येणार नाही, असा निर्णय घेतला होता. कँडबरी, पेप्सीसारख्या कंपन्यां १५ दिवसच साखरेचा साठा ठेऊ शकतील, असे बंधन सरकारने घातले होते. त्यामुळे या कंपन्यांना साखरेची साठेबाजी करता येत नव्हती.

पान ३ वर ▸

उसाच्या उत्पादनाचा एकरी खर्च २०१० – ११

अ. क्र.	घटक	खर्च (रुपये)
१	हंगामी मजूर	६७७५.००
२	कायम मजूर	६०००.००
३	घरगुती मजूर	९७२८.००
४	बैलांची मेहनत	३०००.००
५	यांत्रिकी मेहनत	५०००.००
६	बीज	६०००.००
७	जैविक खते	३०००.००
८	रासायनिक खते	७५०७.००
९	कीटकनाशके	२२२०.००
१०	सिंचन शुल्क	५०००.००
११	इतर खर्च	५०००.००
१२	जमिनीचे भाडे	१५०००.००
१३	शिक्षण अधिभार	२२०.००
१४	उपकरणांचा घसारा	४५२.००
१५	स्थायी भांडवलावरील व्याज	६४९०.००
१६	एकरी उत्पादनाचा एकूण खर्च	८१६९२.००
१७	प्रति एकरी उत्पादन	३५
१८	उत्पादनांचा खर्च	२६८४.०० प्रति टनाचा
१९	तोडणी आणि वाहतुकीचा खर्च	३००.०० प्रति टन
२०	नफा	१५८७६
२१	अपेक्षित दर	२९८४.००रूपये प्रति टन

आर पार ची लढाई

संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने १५ ऑक्टोंबर रोजी जयसिंगपूर येथे नववी ऊस परिषद होत आहे. या ऊस परिषदेत यंदाच्या उसाचा हमीभाव व अन्य शेतीच्या मालाच्या दराची मागणी केली जाणार आहे. सध्या साखर सम्राटांकडून ऊस जास्त असल्याचे भासविले जात आहे. देशात ५० लाख हेक्टर उसाची लागवड झाली असल्याचे सरकार सांगत आहे. तर एकूण ६२२ साखर कारखान्यांपैकी जवळपास ४०० साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरळीत पार पडेल, असे भाकित व्यक्त केले आहे. गतवर्षी साखरेचे भाव गगनाला भिडले असताना तसेच उसाला प्रतिटन ३००० रूपये दर देणे भाग पडत असताना केवळ २२०० रूपयेत शेतकऱ्यांच्या माथी मारले गेले.

यंदाच्या गळीत हंगामासाठी राज्यातील बंद पडलेले ४० साखर कारखाने सुरू करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच या साखर कारखान्यांना कोट्यवधी रूपयांचे पॅकेज दिले आहे. शासनाने राज्यात ऊस जास्त असल्याचे सांगत टाहो फोडत आहेत. उसाला सध्याचा उत्पादन खर्च पाहता पहिला हप्ता २२०० रूपये देणे क्रमप्राप्त आहे. मात्र शरद पवारांच्या कृषी मंत्रालयाने एफआरपी लादून शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा घाट घातला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटना हे कदापि खपवून घेणार नाही. जास्ती उसाचं सोंग आता बंद करा. कारण ऊस जास्त झाल्याचे भासवून शेतकऱ्यांची लूबाडणूक करण्याचा एक कलमी कार्यक्रम कृषीमंत्री शरद पवार राबवत असल्याचे दिसते. गतवर्षी राज्यातच काय देशात उसाची सर्वात मोठी टंचाई आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस लावावे, असे आवाहन कृषीमंत्र्यांनी केले होते. आज ते म्हणत आहेत की उसाचे क्षेत्र जास्त झालेले आहे. शासनाला एवढेच कोडे पडलेले आहे. उसाचे गाळप कसे करायचे? उसाच्या दरावर तोंड उघडायलाही ते तयार नाहीत. गतवर्षी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने ऊस आंदोलन केले नाही. कारण उसाची कमतरता मोठ्या प्रमाणात होती.कारखान्यांनी जास्तीत जास्त दर देण्यासाठी दराची स्पर्धा लावून खासदार राजू शेट्टी यांनी चाणक्यनितीचा अवलंब केला होता. यंदा मात्र परिस्थिती वेगळीच आहे. सरकार उसाचे दर पाडण्याचा प्रयत्न करीत आहे. गतवर्षी साखरेचे उच्चांकी उत्पादन होईल असे भाकित शरद पवार करीत आहेत.गतवर्षीची साखर शिल्लक आहे असेही ते सांगत आहेत. मग गतवर्षी साखरेची टंचाई होती. तर यावेळी साखर शिल्लक राहिलीच कशी काय? म्हणजेच सरकार चुकीचे आकडे जाहीर करून शेतकऱ्यांनी शुध्द फसवणूक करीत आहे.

राज्यात १ कोटी टन पेक्षा जास्त ऊस असेल तर मग गतवर्षी बंद असलेले व यंदा सुरू असणारे साखर कारखाने उसाचे गाळप करमार आहेत की नाही? मग ऊस शिल्लक राहिलच कसा? ऊस शिल्लक राहणार म्हणून फसवायचे नि दर पाडायचे? दार वर्षापूर्वी सरकारने अशीच खेळी केली होती नि उसाचे दर पाडले होते. यंदाची तोच प्रयत्न करणार आहेत. शेतकऱ्यांनी आंदोलन करू नये कारण आंदोलन केल्यास ऊस शिल्लक राहिल ही भीती निर्माण केली आहे. मात्र वास्तव वेगळेच आहे. मग यंदाचा दर किती मागायचा यासाठी स्वाभिमानी च्या ऊस परिषदेला ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे.

शेतकरी संघटना स्वाभिमानी

◆ वर्ष ५ ◆ अंक २१ ◆१ ऑक्टोबर २०१० ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक :** डॉ. महावीर अक्कोळे ◆ **सह संपादक :** डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,
◆ **मानदसल्लागार :** मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या. बी. जी. कोळसे पाटील पुणे,
. प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी
◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

SWABHIMANI VICHAR (Fortnightly) स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213** या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

वार्षिक वर्गणी
रु. १००/-

साखरेचा कोटा शिल्लक ठेवण्याची मर्यादा वाढविली

पान १ वरून

त्याचा परिणाम, बाजारातून साखरेची उचल करण्याचे थांबले. त्याचा भाव-वरही परिणाम झाला होता. साख-रेचे उत्पादन आता २८ टक्क्यांनी वाढणार असल्याचे संकेत मिळाल्याने केंद्र सरकारने साठा करण्यावरचे निर्बंध काही प्रमाणात उठविण्याचा निर्णय घेतला. आता मोठ्या कंपन्यांना १५ दिवसांऐवजी ९० दिवस साठा करता येणार नाही. त्यामुळे बाजारातील साखरेची उचल वाढणार आहे. त्याचा परिणाम कारखान्यांकडील कोटा कमी होणार आहे. आता मोठ्या कंपन्या बाजारातून जादा साखर उचलू शकतील. मात्र, एवढे पुरसे नाही. सरकारने व्यापाऱ्यांच्या साठ्यावर घातलेली बंधने काही प्रमाणात कमी केली. तर साखरेचा उठाव आणखी वाढेल. सणासुदीच्या दिवसांत साखरेची मागणी वाढून काही प्रमाणात भावही वाढू शकतील.

vishal Yadav 9850291294
9921151199
इंडो प्रिंटर सर्व्हिसेस
Dot Matrix Specialist
■ EPSON, TVS, WEP., HP ■ Sales & Services ■ Dot Matrix, Laser, Inkjet Printer Repairs ■ Printers Carteridges & Toner Refilling
चालू स्थितीतील जुने प्रिंटर मिळतील.
९ वी गल्ली, सुभाष रोड, देमापुरे ऑईल मिलजवळ, जयसिंगपूर

आदिशक्ती कन्स्ट्रक्शन
जयसिंगपूर
प्रोप्रा. मिलींद साखरपे

श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२१९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३
■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ ताळापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.धी अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १३००० कर्ज १० टक्के व्याजदराने

ठेवी	कर्जे	ऑडिट वर्ग		स्वभांडवल	गुंतवणूक	एन.पी.ए.
४१४७.९५	२१७८.७१	----	नफ्यात	४५५.१५	२१८९.४३	३.३७ टक्के

श्री. व्ही. बी. हुग्गे. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर
श्री. अशोक शां रूणवाळ. बी. कॉम व्हा. चेअरमन व सर्व संचालक
पै. विठ्ठल बाबूराव मोरे एम. ए. चेअरमन

TEXMO INDUSTRIES
५२ वर्षांची विश्वासाची परंपरा
Taro
SKF Ball Bearings
जैन एच.डी.पी.ई. पाईप्स
BCH स्टार्टर
अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली, जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२९९७३९४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ, पटेल चौक, सांगली.
फोन नं.(०२३३) २६२९०९६ मोबा.:९९६०४०६३९३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/ २४३९०८
मोबा. : ● विपुल - ९३२६९५३०२७ ● बाबासाहेब : ९३२५७६१२२९

प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266
Shree Datta Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

नगर जिल्ह्यात दूध भेसळ सम्राटांवर छापे

नगर (स्वाभिमानी वृत्तसेवा) : मानवी आरोग्याला घातक असणाऱ्या रासायनिक दुधाचे रॅकेट नगर जिल्ह्यात उघडकीस आल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहेत. अनेक मान्यवरांशी संबंधित प्रकल्पांना या रासायनिक दुधाचा पुरवठा झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याने पुढच्या कारवाईकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. प्रामुख्याने मुंबई, पुणे, नागपूर आदी महानगरातील ग्राहकांना विविध ब्रँडच्या पिशव्यांतून हे रासायनिक दूध विकले जाते. गेल्या काही वर्षांमध्ये सुरू असलेला गोरख धंदा नगरते पोलीस अधीक्षक कृष्णप्रकाश यांनी उघडकीस आणला आहे.

पोलिसांनी आतापर्यंत २२ लोकांना अटक केली आहे. ४० आरोपी फरारी आहेत. राज्य सरकार दूध प्रकल्पांना कोट्यवधी रूपयांचे अनुदान देते. त्यातूनच दूधसम्राट मालामाल होतात. सहकारी व खासगी दूध प्रकल्पांतील दुधात घातक रसायनांचे बेमालून मिश्रण करण्यात येते. जिल्हा पोलीस प्रमुख कृष्णप्रकाश यांनी सुत्रे स्वीकारल्यापासून अवैध धंद्याविरूध्द मोहिम उघडली आहे. श्रीराम येथे छापा टाकून रासायनिक दूध बनवणाऱ्या प्लँटवर छापे टाकले. त्यातून हे रॅकेट उघडकीस आणले. त्यातून रासायनिक दूध बनविणाऱ्यांचे धाबे दणाणले. शोधनोहीम सुरू होताच त्यांनी आपला धंदा बंद केला. त्यामुळे जिल्ह्यात थोडेथिडके नव्हे, तर दोन लाख लिटर दूध संकलन घटले आहे.

पुणे येथील डॉक्टर लॅब व नागपूरच्या प्रयोगशाळेत रासायनिक दुधाची तपासणी करण्यात आली. त्यात कार्बोलिक्सिंग , ॲसिड, ॲलीफॅटीक पॉलीमर, पॅरोफीन, कॉस्टीक सोडा, सोफ डिटर्जंट, युरिया, सोडिअन लॉरेल सल्फेट ही रसायने आढळून आली. या रसायनांमुळे ॲलर्जी, श्वसनक्रियेचे विकार, अस्थमा, वंध्यत्व, नपुसकत्व, कीडनी लिव्हरचे आजार कर्करोग आदी प्रकारचे आजार होतात. असे निष्कर्षात पुढे आले. लहान मुलांच्या चयापचय क्रियेवर विशेष परिणाम होतो. नैसर्गिक दुधातील लायसीन प्रोटीन हा घटकच रसायनांची भेसळ नष्ट करतो. त्यामुळे भेसळ पाच

ते दहा टक्के होत असली, तरी सर्व दुधाचे पोषकमूल्य नष्ट होते. नगर जिल्ह्यात दूध संकलन घटले असले तरीही पुणे, बीड, सातारा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांत रासायनिक दुधाची निर्मिती पूर्णपणे बंद झालेली नाही. लोकांच्या आरोग्याशी खेळला जाणारा हा खेळ बंद करणे दूधधंद्याशी संबंधित असलेल्या काँग्रेस – राष्ट्रवादीच्या प्रभावशालीच्या नेत्यांमुळे मुश्कील बनले आहे. दूध उत्पादक शेतकरी पाणी मिसळून डेअरीला दूध घालत असे. त्यामुळे दुधाची पावडर करून पिशवीबंद दूध महानगरांतून सहकारी संस्था व खासगी प्रकल्पांचे दूध विविध ब्रँडच्या नावाने विकले जाते. दूध उत्पादकांना रास्त दर मिळावा, ग्राहकांना किफ ायतशीर दरात दूध मिळावे म्हणून सरकार प्रतिलिटर वाहतूक, व्यवस्थापन खर्च आदींसाठी अडीच ते तीन रूपयांपर्यंत जाते. त्यासाठी कोट्यवधींचे अनुदान सरकार खर्च करते. मात्र, खासगी डेअरी चालक, टँकरने रासायनिक दूध खरेदी करून कोटा पध्दतीचा लाभ उठवत नफेखोरी करीत आहेत. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुनिल कडासने यांनी रासायनिक दूध निर्मितीसाठी रसायने विकणाऱ्या मनोहर राननावी व सुमतीलाल गुजराणी यांच्या दुकानावर, गोदामांवर छापे टाकून रसायनांचे बॅरेल, रासायनिक पावडर, ग्लुकोज पावडर, स्टार्च पावडर, स्टार्च पावडर असा मोठा साठा जप्त केला. राहुरी, राहाता, नेवासे, श्रीरामपूर, संगमनेर, या तालुक्यातील गावोगांवचे दूध संकलन, दूध प्रकल्पाचे, चालक हा माल खरेदी करत असल्याचे निदर्शनास आले. अनिल वायकर नावाच्या दूध संकलकाकडे छापा टाकला असता रसायनांच्या मिश्रणांचा वापर करून त्याने २०० लिटर दूध तयार केल्याचे आढळून आले. रासायनिक दुधाची निर्मिती प्रक्रिया थक्क करणारी आहे. त्यासाठी गाई, म्हशी, शेळ्यांची गरज नसते. विशेष म्हणजे .या दुधाला रंग, गंध आणि चव नाही. हे रासायनिक दूध कितीही काळ टिकते. दुधात २० ते ४० टक्के रसायन मिसळले असते. संकलन केंद्र चालक हे दूध खासगी प्रकल्पांना आणि नंतर ते सहकारी संघाना पाठवतात. ग्राहकांना ते पिशव्यातून मिळते. गेल्या पाच वर्षापासून हा उद्योग बेमालूमपणे सुरू आहे. या काळ्या धंद्यातील पैशामुळे त्यांना बरकत आलेली आहे. रोडपती असलेले हे संकलम केंद्रचालक करोडपती बनलेले आहेत.

महानंदा व सरकारी दूध योजना जिल्हा व तालुका दूध संघाना ठराविक टँकरचा कोटा देते. तो कोटा पूर्ण करण्यासाठी मग हे संघ खासगी प्रकल्पांकडून दूध स्वीकारतात. कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांचा संगमनेर, परिवहनमंत्री राधाकृष्ण विखे यांचे मेव्हणे राजेश परजणे यांचा गोदावरी, साई संस्थानचे अध्यक्ष जयंत ससाणे यांचा श्रीरामपूर, आमदार शंकरराव गडाख यांचा नेवासे, माजी मंत्री विजयसिंह मोहिते यांचा सोलापूर, भंडारा, त्याचबरोबर दिनशॉ, हल्दीराम, प्रभात, माजी आमदार भानुदास मुरकुटे यांचा अशोक मिल्क आदींसह राज्यातील २२ प्रकल्पांनी दूध खरेदी केले. त्यामुळे तपासी अधिकारी पोलीस उपअधीक्षक प्रकाश मुंडे यांनी त्यांना नोटिसा पाठवल्या आहेत.

खासदार राजू शेट्टींना प्रा. मधु दंडवते पुरस्कार

जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा) : नगर येथील स्नेहालय संस्थेच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा 'प्रा. मधू दंडवते संसदपटू पुरस्कार' स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक, खासदार राजू शेट्टी यांना जाहीर झाला. खासदार शेट्टी यांनी ऊस आणि दूधाचा प्रश्न ज्वलंत ठेवत शासनाला मागण्या मान्य करण्यास भाग पाडले.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांची सक्रिय फ ळी तयार केली. संसद आणि संसदे बाहेरही त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फ ोडली. शेतकऱ्यांच्या न्यायासाठी दिलेल्या लढ्याची दखल घेऊन स्नेहालय या संस्थेच्या वतीने यंदाच्या प्रा. मधू दंडवते संसदपटू पुरस्कारासाठी त्यांची निवड केली. २६ सप्टेंबर रोजी स्नेहालय पुनर्वसन संकुल एम. आय. डी. सी. निंबळक, नगर येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे. रोख अकरा हजार रुपये, सन्मानपत्र, शाल, श्रीफ ळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

ग्लोबल वार्मिंगमुळे दूध उत्पादन घटले

कोल्हापूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): ग्लोबल वार्मिंगमुळे अर्थात विविध कारणांमुळे पृथ्वीचे तापमान सतत वाढत असल्यामुळे दुभत्या गायी व म्हशींच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन भारतातील दुग्ध उत्पादनही दरवर्षी सुमारे दोन टक्क्यांनी घटत आहे. दूध उत्पादनात झा–लेली ही घट २,६६१ कोटी रुपयांहून अधिक मूल्याची असल्याचा निष्कर्ष शास्त्रज्ञांनी काढलेला आहे.

नॅशनल डेइरी रिसर्च इन्स्टिट्यूट या संशोधनसंस्थेच प्रिन्सिपल सायण्टिस्ट फॉर ॲनिमल फिजिऑलॉजी म्हणून कार्यरत असलेले आर. सी. उपाध्याय या संदर्भात माहिती देताना म्हणाले, मोठ्या प्रमाणावर तापमानात आणि ओलाव्यात सतत होत असलेल्या बदलांमुळे दुभत्या जनावरांना दीट स्ट्रेस ला तोंड द्यावे लागते. तापमान वाढले की त्याचा परिणाम दुभत्या जनावरांना वयात येण्याकरिता लागणाऱ्या कालावधीवर होतो. सभोवतालचे तापमान वाढले की, जनावरांच्या प्रजननक्षमतेवरही प्रतिकूल परिणाम होतो. ग्लोबल वार्मिंगमुळे वातावरणातील उष्णता वाढून देशातील दुभत्या जनावरांच्या प्रकृतीवर व दुग्ध उत्पादनक्षमतेवर वाईट परिणाम होऊन दरसाल सरासरी १८ लाख दुधाचे नुकसान होत आहे. भारतात गतवर्षी ११० दशलक्ष टन दुधाचे उत्पादन झाले आहे. दूध उत्पादनात सातत्याने घट होत आहे. ही संपूर्ण देशाची सरासरी १८ लाख टन दुधाचे नुकसान होत आहे. भारतात गतवर्षी ११० दशलक्ष टन दुधाचे उत्पादन झाले आहे. दूध उत्पादनात सातत्याने घट होत आहे. ही संपूर्ण देशाची सरासरी असली तरी काही राज्यांमध्ये होत असलेले नुकसान सर्वाधिक आहे. देशातील सर्वाधिक दुग्ध उत्पादन असणारे राज्य असलेल्या उत्तरप्रदेशातील हीट स्ट्रेस च्या परिणामी दरसाल २५.४ दशलक्ष टनाचे, तर तामिळनाडूत २३.८ दशलक्ष टन दुधाचे नुकसान होत आहे. राजस्थान, बिहार, गुजरात, आंध्रप्रदेश, हरियाणा, या राज्यांतही देशातील इतर भागांच्या तुलनेत उष्म्यामुळे होणारे दुभत्याचे नुकसान अधिक आहे. याच विषयावर युनायटेड स्टेटस्, ब्राझिल, जर्मनी, फ्रान्स, इंग्लड, ऑस्ट्रेलिया या देशांत झालेल्या संशोधनातूनही असात निष्कर्ष (हवेतील उष्णतावाढीमुळे दुभत्या जनावरांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम होऊन दूध उत्पादन घटणे) निघाला आहे.

● चलो जयसिंगपूर ● चलो जयसिंगपूर

शेतकरी संघटना स्वाभिमानी

९ वी ऊस परिषद

लबाड लांडगं ढोंग करतंय
जास्त ऊसाचं सोंग करतंय



डिझेल, वीज, बियाणे, खते झाली महाग, होऊ दे पन..
शेतकरी खुळा होऊन माझ्याच मागनं येऊ दे !
ऊसावरून करायचं राजकारण गड्या लै सोप्पं
जास्तीत जास्त ऊस स्वस्तात स्वस्त मिळू दे !!

ह्यो लांडगा सांगतो म्हून ऐकायचं काय ?
अन् खायाचं काय ?
साखरंचा भाव काय ? अन् ऊसाला दर काय ?
कॉय! कॉय! करून कुत्र्यावानी रडायचं सोडा
दिसेल तिथं त्यास्नी कांडक्यानंच फोडा...!

आयोजक
स्वाभिमानी प्रतिष्ठान

शुक्रवार, दि. १५ ऑक्टोबर २०१०
विक्रमसिंह मैदान, जयसिंगपूर, दु. २ वा.

● निमंत्रक : खासदार राजू शेट्टी
● प्रमुख मार्गदर्शक : सदाभाऊ खोत

गावाच्या विकासासाठी फंडातून भरीव निधी देणार

कुरुंदवाड, (स्वाभिमानी वृत्तसेवा) : गणेशवाडी (ता. शिरोळ) गावाच्या विकासासाठी खासदार फं डातून भरीव निधी देणार असून ग्रामपंचायतीच्या नुतन पदाधिकाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याची ग्वाही खासदार राजू शेट्टी यांनी दिली.

येथील नव चॅलेंज बालाजी युवा ग्रुपच्यावतीने श्री गणेश मंडळाच्या स्वागतासाठी दसरा चौकात उभारण्यात आलेल्या स्वागत कमानीच्या उद्घाटनप्रसंगी श्री. शेट्टी बोलत होते. यावेळी गोकुळचे संचालक दिलीप पाटील, उल्हास पाटील, सिदगोंडा पाटील, अजित चौगुले, जितेंद्र गुड्डाकाई आदि प्रमुख उपस्थित होते.

खासदार शेट्टी म्हणाले, '' गणेशवाडी गावाचा विकास गेल्या दहा पंधरा वर्षात खुंटला आहे. मतदारांनी आता नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना पंचायतीत संधी दिली आहे. या सदस्यांना माझे पूर्ण पाठबळ असणार आहे. विकास कानासाठी भरीव निधी देणार असून सरपंच उपसरपंचासह सदस्यांनी ग्रामस्थांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरावा यासाठी जोमाने काम करावे.''

उपसरपंच बळवंत गोरवाडे म्हणाले, '' गावाचा विकास हाच आमचा ध्यास आहे. विकास कामात कुठलाही भेदभाव न करता गावाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आम्ही काम करणार आहोत. सर्व पक्ष संघटनांचे कार्यकर्ते पंचायतीत निवडून आले आहेत मात्र एका विचाराने एकत्र आले आहेत. सत्तेची मोट अशीच कायम राहील त्यात कुणी विष कालवू नये.''

यावेळी दिलीप पाटील, उल्हास पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत कमानीत पंचदीप, सिध्दीविनायक, स्टार, क्रांती, जयजवान, विनायक, अचानक, नवभारत, नागराज गणेशोत्सव मंडळासह विविध तरूण मंडळाच्या अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. खासदार शेट्टी यांच्या हस्ते नूतन सरपंच विजय गावडे, उपसरपंच बळवंत गोरवाडे यांच्यासह नुतन ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी धनपाल उदगावे, आण्णासाहेब गोरवाडे, विजयकुमार गाताडे, सुभाष शिरगावे, नारायण वास्कर, अशोक कोगनोळ, आपाण्णा आणुरे, बाबुराव कोळेकर, राघू गोरवाडे, आण्णासाहेब कोगनोळे यांच्यासह विविध पाणी पुरवठा, पतसंस्था सेवा संस्था पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन नव चॅलेंज बालाजी ग्रुपचे अध्यक्ष सुनिल गोरवाडे, उपाध्यक्ष सुरेश गावडे यांनी केले.

गणेशवाडी : येथील दसरा चौकात उभारण्यात आलेल्या गणेश उत्सव स्वागत कमानीचे उद्घाटन करताना खासदार राजू शेट्टी शेजारी दिलीप पाटील, उल्हास पाटील, विजय गावडे, बळवंत गोरवाडे आदि.

एफ आरपीनुसार उसाला किंमत अमान्य

भवानीनगर : ''उसाच्या कांडक्याला सोन्याचा भाव मिळावा यासाठी एफ आरपीप्रमाणे उसाला मिळणारी किंमत मान्य नाही. केंद्राच्या धोरणास विरोध म्हणून शेतकरी संघटना आंदोलन उभारणार आहे,'' अशी घोषणा खासदार राजू शेट्टी यांनी केली.

बिचूद (ता. वाळवा) येथे सत्कार समारंभात ते बोलत होते. खासदार शेट्टी यांचा रामदास पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

श्री. शेट्टी म्हणाले, ''केंद्र सरकारच्या धोरणावर शेतीचे भवितव्य आहे. केंद्र सरकार एफ आरपी प्रमाणे उसाची किंमत ठरवून ऊस जास्त असल्याचे भासवून शेतकऱ्यांची दिशाभूल करीत आहे. टनाला ८६२ रुपये खर्च ऊस उत्पादनास येतो असे केंद्राचे म्हणणे आहे. उत्पादन खर्च अधिक नफा निम्मा म्हणजे येणारी रक्कम एफ आरपी होय. मग ८६२ रुपये येणारा खर्च असे कोणते शेत आहे हे केंद्राने दाखवावे. क्षेत्र वाढले असले तरी उत्पादन कमी आहे. एकाच शेतकऱ्याने चार कारखान्यांना ऊस नोंद केल्याने ऊस क्षेत्र वाढल्याचे दिसते.''

ते म्हणाले,''आम्ही गेल्या वर्षी शिल्लक उसाचा दर जाहीर करण्याची मागणी केली होती, पण केंद्र शासनाने ते टाळले. यावर्षी शिल्लक उसाचा दर जाहीर करून शेतकऱ्यांत उत्पादन वाढीची भीती पसरवण्याचे काम सुरू आहे. ऊस शिल्लक राहीला तर ती जबाबदारी माझी राहील. टनाला पहिला हप्ता २२०० रुपये मिळेपर्यंत कारखाने सुरु होऊ देणार नाही.'' सदाभाऊ खोत म्हणाले, ''खासदार राजू शेट्टी यांच्या रूपाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाची जाण असणारा नेता मिळाला आहे.''

बी. जी. पाटील, राजेंद्र मोहिते, विकास देशमुख, अप्पासाहेब पाटील यांची भाषणे झाली. जयवंत पाटील, संदीप पाटोळे, रामदास पाटील, भानुदास तांदळे, प्रल्हाद पवार, संभाजी गोडसे, रमाकांत कुलकर्णी, शिवाजीराव मोरे, शामराव तांदळे उपस्थित होते.

बिचूद : येथील संपर्क दौऱ्यात बोलताना खासदार राजू शेट्टी.

बांबू प्रक्रिया उद्योग साकारणार

खासदार शेट्टी : साडेसात कोटींच्या प्रकल्पाचा प्रस्ताव तयार

जयसिंगपूर : राष्ट्रीय बांबू लागवड अभियानाअंतर्गत ग्रामीण रोजगाराला मोठी संधी देताना बांबू प्रक्रिया उद्योग नजीकच्या काळात साकारणार असल्याची माहिती खासदार राजू शेट्टी यांनी 'सकाळ'शी बोलताना दिली. शाहूवाडी तालुक्याच्या संपर्क दौऱ्यातील मुलाखतीत ते बोलत होते. सह्याद्रीच्या घाट माथ्यावरील दुर्गम अशा शाहूवाडी, गगनबावडा, पन्हाळा या तालुक्यांतील भूमिपुत्रांना स्थानिक ठिकाणी स्वयंरोजगार देणारा हा प्रकल्प असेल. साडेसात कोटींचा हा प्रकल्प केंद्र शासनाच्या अंतिम टप्प्यातील मंजुरीस प्रस्तावित असल्याचे श्री. शेट्टी यांनी स्पष्ट केले.

बांबू लागवड व त्यावर प्रक्रिया उद्योग कार्बन क्रेडिट सबलत व पर्यटन विकास असा बहुउद्देशीय असलेला हा प्रकल्प डोंगरी भागातील भूमिपूत्रांना रोजगार, तर शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय मिळवून देणारा असल्याने, हा प्रकल्प प्राधान्याने हाती घेतल्याचे श्री. शेट्टी यांनी स्पष्ट केले.

या भागात सहज येणारे, जंगली प्राण्यांपासून हानी होणार नाही. अतिवृष्टीत तग धरेल अशी बांबू लागवड चांगली होऊ शकते. राष्ट्रीय बांबू लागवड मोहिमेअंतर्गत उघडे डोंगर, माळ बांबू लागवडीखाली आणता येतील. त्यातून पर्यावरण साधले जाईल व उत्पादित मालाला शेतकऱ्याला योग्य भाव मिळावा म्हणून बांबू प्रक्रिया उद्योग हाती घेण्याचे निश्चित करून, तसा प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे अंतिम मंजुरीस दाखल केला आहे. कोईमतूर (नागालँड) येथे होत असलेल्या आंतरराष्ट्रीय बांबू परिषदेनंतर या प्रकल्पाच्या उभारणीच्या दृष्टीने बांबू लागवडीची मोहीम हाती घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खासगी जागेबरोबर मुलकीपड, शासकीय जागा, शेतीच्या बांधांवरही बांबू लागवड करणारे प्रशिक्षणे देऊन लागवडीचे तंत्रशुद्ध मार्गदर्शन करण्याची मोहीम शेतकरी संघटनेमार्फत हाती घेत आहोत. रोपवाटिकेद्वारे महिलांना रोजगारात सहभागी करून घेता येईल. उत्पादित बांबू मालाला स्थानिक ठिकाणी बाजारपेठ मिळावी म्हणून जिल्हा परिसरात तीन बाजारपेठा सुरु करण्याचे नियोजन आहे. बांबूपासून औद्योगिक वस्तू, शोभिवंत वस्तू, रासायनिक प्रक्रिया केलेल्या फरशा, पडदे, तावदाणे, झडपा, बांबू हॉटेल, रेस्टॉरंट यासाठी लागणारे उच्च दर्जाचे फर्निचर बनवणारा प्रकल्प होणार असल्याने, या रमणीय परिसरात पर्यटन विकासाला गती मिळणार आहे. नवा रोजगार तरुणांपुढे उपलब्ध करता येणार आहे. साहजिकच जिल्ह्याच्या पश्चिम भागातले हजारो तरुण मुंबई, पुणे व गोवा या शहरांत चाकरीसाठी स्थलांतरित झाले आहेत. त्यामुळे मालकीच्या जागा पडून आहेत. बांबू लागवडीतून शेतकऱ्यांना पीक उत्पन्नाची संधी देत प्रक्रिया उद्योग व माल विक्री केंद्रांद्वारे तरुणांना रोजगार व पर्यटन व्यावसायाला गती व पर्यावरण संवर्धनाचे उद्दिष्ट या प्रकल्पातून साध्य होईल.

प्रकल्पाला कार्बन क्रेडिटची मान्यता मिळवून देण्याचा विशेष प्रयत्न केला जाईल. बांबू लागवडीमुळे ऑक्सिजननिर्मितीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे. ग्लोबल वॉर्मिंगच्या पार्श्वभूमिवर बांबू लागवड उत्पादकांना कार्बन क्रेडिटची सबलतीने अधिक नफा मिळवून देता येईल, अशी आशा श्री. शेट्टी यांनी व्यक्त केली.

पश्चिम घाटावर बांबूचे हिरवे सोने बहरेल

खासदार शेट्टी : नागालँडमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेतील चर्चासत्रात सहभाग

कोल्हापूर, ता. १९ : ''राष्ट्रीय बांबू लागवड मिशनद्वारे बांबू लागवड व बांबू उद्योगाबाबत नागालॅंड, मणिपूर या पूर्वेकडील राज्यांनी राबवलेले धोरण महाराष्ट्र शासनाने स्वीकारले तर पश्चिम घाटावर बांबूचे हिरवे सोने बहरेल,'' असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले. नागालॅंडची राजधानी कोहिमा येथे उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आंतरराष्ट्रीय बांबू परिषदेतील चर्चासत्रात ते बोलत होते. परिषदेत त्यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. तीन दिवसीय बांबू परिषदेची काल सांगता झाली. श्री. शेट्टी म्हणाले, ''पूर्वेकडील राज्यांनी बांबू लागवड व बांबू उद्योगातून शेतकरी भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध केला आहे. तेथील बांबूच्या उत्पादित वस्तूंना परदेशी पर्यटकांची मोठी पसंती आहे. तेथील राज्यकर्त्यांनी बांबू लागवडीस ९० टक्क्यांपर्यंत अनुदान देऊ केले आहे, तर उद्योगासाठी सबसिडी व १०० टक्के करमाफी दिली आहे. राष्ट्रीय बांबू मिशनद्वारे शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत बांबू पीक लागवडीचे जागरण केले जात आहे. महाराष्ट्राच्या कृषी विभागाने या बांबू पीक लागवड व प्रक्रिया उद्योगासाठी पूर्वेकडील राज्यांप्रमाणे धोरण स्वीकारले तर पश्चिम घाटाच्या पडीक डोंगरावर सोने बहरण्यास वेळ लागणार नाही.''

परिषदेत श्री. शेट्टी यांनी राष्ट्रीय बांबू मिशनचे अध्यक्ष कानेश सानप यांच्याशी बांबू उद्योगाबाबत धोरणात्मक चर्चा करून कोल्हापूरच्या ग्रामीण भागात प्रायोगिक तत्त्वावर बांबू लागवड करून बांबू प्रक्रिया उद्योग उभारीत असल्याचा मनोदय मांडला. परिषदेत बांबूवर प्रक्रिया केलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन मांडले होते, तर संबंधित मशिनरींचे स्टॉल उभारले होते.

अतिवृष्टीमुळे मूगाची हानी

राजस्थानातील विक्रमी उत्पादनामुळे भावात घट

अमरावती(प्रतिनिधी): राजस्थानात यंदा मुगाचे विक्रमी उत्पादन झाल्याने स्थानिक बाजारपेठेवरही त्याचे परिणाम जाणवायला लागले असून मुगाचे भाव गडगडले आहेत. कऱ्याच भागात अतिवृष्टीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना हा दुहेरी फटका बसला आहे.

ऐन काढणीच्या वेळी आलेल्या पावसामुळे अनेक भागात पिकांचे नियोजन झाले. अनेक संकटावर मात करीत या खरीप हंगामातील पहिले पीक शेतकऱ्यांच्या हाती आले असून अमरावतीच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत मुगाची आवक सुरू झाली आहे. मूगाला सध्या २ हजार ते ३८०० रूपये प्रति क्विंटल भाव मिळत आहे. बाजारात सुमारे २ हजार पोते मूगाचे आवक झाली. सुरूवातीला मूग ओला असल्याने कमी भाव मिळाला पण, आठवडा उलटूनही मुगाचे भाव फारसे वधारले नाहीत. पण, कोरड्या मुगाचे भाव ३८०० रूपये प्रती क्विंटलवर पोहोचला आहे. मूगाचे आवक पोळ्यापासून सुरू होते. मूगाला गुजरात, दिल्ली, पंजाब आणि देशातील इतर काही राज्यांमधून विशेष आवक पोळ्यापासून सुरू होते. पण, यंदा राजस्थानात मुगाचे विक्रमी उत्पादन झाल्यामुळे दिल्ली आणि गुजरातमधून होणारी मागणी असते, पण यंदा राजस्थानात मुगाचे विक्रमी उत्पादन झाल्यामुळे दिल्ली आणि गुजरातमधून होणारी वळल्यामुळे स्थानिक बाजारपेठेवर त्याचा परिणाम जाणवायला लागला आहे. मात्र, गेल्या वर्षीपेक्षा यंदा मुगाचे उत्पादन चांगले होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अमरावती जिल्ह्यात सोयाबीन कापूस आणि तुरीच्या खालोखाल मूगाची पेरणी झाली. दर्यापूर, भातकुली अंजनगांव सुर्जी या तालुक्यात मूग मोठ्या प्रमाणावर जाणवायला लागला आहे. काढणीच्यावेळी सुरू झालेल्या पावसामुळेही नुकसान झाले. गेल्या काही दिवसापासून कडक उन्हामुळे मुगामधील आर्द्रता २२ टक्क्यांहून १५ टक्क्यांपर्यंत खाली गेला आहे. कोरड्या आणि चांगल्या प्रतिच्या मुगाला ३७०० ते ९०० पर्यंत भाव मिळत आहे. तर पांढरा रंग झालेला मूग १७०० रूपयापर्यंत विकला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून बाजारात मुगाची आवक वाढली आहे. गेल्या वर्षीपेक्षा यंदा चांगले भाव मिळतील, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती पण दिलेली आणि गुजरात येथील केंद्रानी त्यांच्या मोर्चा राजस्थानात वळवल्याने स्थानिक बाजारपेठेतून होणारी मागणी ४० टक्क्यांपर्यंत घटली, त्याचा परिणाम मुगाच्या दरावरही झाला आहे.

लवासाप्रकरणी लोकसभेत लक्षवेधी मांडणार : खासदार राजू शेट्टी

जयसिंगपूर (प्रतिनिधी): लवासा प्रकरणात एका बड्या राजकीय नेत्याचा व त्याच्या कन्येचा हात असून याबाबत आपण लोकसभेच्या आगामी हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडणार आहे,अशी माहिती खा.राजू शेट्टी यांनी दिली .

ते म्हणाले, पुणे जिल्हातील मुळशी आणि वेल्हे तालुक्यातील जवळपास २० गावांतील २५ हजार एकर क्षेत्रावर लवाला नावाचे हिलस्टेशन विकसित होत आहे. त्यासाठी एका कंपनीची स्थापना करण्यात आलेली आहे. या कंपनीने हजारो एकर जमीन बेकायदा खरेदी केल्याचे नुकतेच उघडकीस आलेले आहे. अर्बन लॅंड सिलिंग कायदा धाब्यावर बसवून या प्रकल्पाच्या व्यवहारात काळेबेरे झाल्याचा संशय आहे. कृष्णा खोरे महामंडळाच्या मालकीची मोठी जमीन नाममात्र भाडेपट्ट्यामे देण्यात आलेली आहे, असे चौकशीत समोर येत आहे. याशिवाय मुळशी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी अतिरिक्त ठरविण्याचा प्रकार संशयास्पद आहे.

स्थानिक शेतकऱ्यांच्या हक्काच्या आणि शासकीय मालकीच्या जमिनी मातीमोल भावाने मिळविण्याचे उद्योग सुरू असल्याचे दिसत आहे. यामुळे स्थानिक भूमिपूत्र देशोधडीला लागणार आहेत. ते पुढे म्हणाले, या प्रोजेक्टमुळे संपूर्ण सह्याद्री पठारावरील पर्यावरण धोक्यात आल्याचा अभ्यासकांचा दाव आहे. अनेक दुर्मिळ वनस्पतींचे अस्तित्व धोक्यात येऊ लागले आहे. सह्याद्री पठारावरील छोटे – मोठे बदलही जागतिक हवामानावर आणि पर्यावरणावर गंभीर परिणामकारक ठरतात, हे संशोधनाअंती सिध्द झालेले आहे. असे असताना सह्याद्री पठारावर सध्या सुरू असलेल्या बांधकामामुळे या पठारावरील पर्यावरण धोक्यात आलेले आहे. पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांना देशातील पंतप्रधान सडक योजनेतील अनेक रस्ते प्रकल्पाचे प्रस्ताव पर्यावरणाच्या नावाखाली प्रलंबित आहेत. पर्यावरण मंत्र्यांना लवासा प्रकरणातून होत असलेला पर्यावरणाचा ऱ्हास दिसत नाही काय? असेही त्यांनी शेवटी सांगितले.

शेतकरी काढत आहेत पैशाचे पिक

आंध्रप्रदेशाच्या निजामाबाद जिल्ह्यातील शेकडो शेतकरी पैशाचे पीक काढत असून अर्मूर तालुक्यातील छोट्या – छोट्या गावांमध्येया धनवंत भूमिपुत्रांचे राजेशाही इमले उभे राहत आहेत. हैदराबादच्या बंजारा हिल्स वरच्या लक्ष्मीपुत्रांच्या प्रासादांशी स्पर्धा करण्याची ताकद या शेतकऱ्यांमध्ये आली ती पिकांच्या कल्पक नियोजनामुळे आणि बाजारपेठांमधील वारे ओळखून शेती केल्याने. शेती ही सदैव तोट्यात जात नाही, उलट उत्तम नियोजन केले तर तिच्यातून मोठी संपत्ती निर्माण होऊ शकते, हे या शेतकऱ्यांनी दाखवून दिले. या शेतकऱ्यांनी हळद, टोमॅटो ही नगदी पिके तसेच भाजीपाल्यावर गेल्या काही वर्षांक भर दिला आहे. जय किसान म्हणून त्यांना सलाम करताना काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात लागतात. त्या म्हणजे , या परिसरात पाणी मुबलक आहे. मोठ्या बाजारपेठा जवळ आहेत. शेतकरी अल्पभूधारक नाहीत आणि त्यात रेड्डी कुटुंबे बरीत आहेत. मराठा जातीसारखेच ही प्रभावी जात आहे. अशा प्रभावाचे स्वाभाविकच अनेक लाभ होतात. हे अनुकूल घटक असले तरी या शेतकऱ्यांनी दी जिद्द, दूरदृष्टी आणि बाजाराची समज दाखवली तिचे महत्व कमी होत नाही. हळद पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनी ऐन उन्हाळ्यात टोमॅटो पिकवून जास्तीत जास्त भाव मिळवला. या शेतकऱ्यांनी जवळची नागपूर बाजारपेठ तर काबीज केलीच, पण थेट सांगलीपर्यंत धटक मारली. हे शेतकरी सांगतात की, आमचे बाजारपेठांकडे बारीक लक्ष असते. बाजारातील स्थितीप्रमाणे आम्ही पटकन् पिके बदलतो. पीक नियोजनातील ही लवचिकता बऱ्याच मराठी शेतकऱ्यांनीही आत्मसात केली आहे. पण जे शेतकरी परंपरागत पिकांच्या, त्यातून होणाऱ्या तोट्याच्या आणि मग वाढणाऱ्या कर्जाच्या सापळ्यात अडकले आहेत, त्यांना यातून सोडवायचे कसे, ही खरी समस्या आहे. आज विदर्भ जसा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी ग्रासला आहे, तसाच आंध्रही, पण आंध्रमधील या संकटाती तीव्रता कमी होते आहे. या यशात दिवंगत मुख्यमंत्री वायएरआर रेड्डी यांचा मोठा वाटा आहे. सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि शेतकऱ्यांच्या बांधावर उभे राहात, अशी आठवण ज्येष्ठ कृषिशास्त्रज्ञ शेतीमंत्री सी. सुब्रमण्यम स्वामीनाथन सांगतात. आज तेवढे न करता शेतकऱ्यांसाठी आखलेल्या योना प्रामाणिकपणे राबवल्या तरी मोठेच उपकार होतील. नाहीतर आंध्रच्या शेतकऱ्यांचे कौतुक करताना आपल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची जखम मात्र तशीच ओली राहील.

श्रीनगर : जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर असलेल्या शिष्टमंडळाचे नेते केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी तंगमार्ग या संचारबंदी असलेल्या गावाला भेट दिली. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी प्रामुख्याने उपस्थित होते.

शिक्षण, रोजगार काश्मीर प्रश्नाचे मूळ

खासदार राजू शेट्टी यांचे मत

पुणे (स्वाभिमानी वृत्तसेवा): 'पुरेसे शिक्षण आणि रोजगार मिळत नसल्यामुळे काश्मीरमधील युवकांचे प्रश्न गंभीर बनत आहेत. हे प्रश्न सोडवल्याशिवाय तिथले जनजीवन सुरळीत होणार नाही.' असे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी केले. ते सरहद आणि रौनक प्रतिष्ठानच्या वतीने मकाश्मीरप्रश्नफ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी शेट्टी बोलत होते. केंद्रीय गृहमंत्री पी. चिदबंरम् यांच्या अध्यक्षतेखाली शिष्टमंडळाने काश्म ीरला भेट दिली. या शिष्टमंडळात खासदार राजू शेट्टी यांचा प्रामुख्याने समावेश होता. तेथील अनुभल त्यांनी सांगितले. सरहद संस्थेचे संजय नहार, जया शेट्टी उपस्थित होते. खा. शेट्टी म्हणाले, तेथील १४ – ४५ वर्षांची मुलेही हाताता दगड घेऊन हिंसाचारामध्ये सहभागी झालेली आहेत. त्यामुळे ती हिंसक झालेली आहेत. महाविद्यालयीन युवकांमध्येही असुरक्षितता जाणवते.

इतर राज्यांतील तरूणांच्या तुलनेत आपल्याला सावत्र वागणूक दिली जाते, अशी भावना त्यांच्याम ध्ये आहे. त्यांना योग्य शिक्षण आणि रोजगार मिळावा. युवकांसाठी तिथे लघुउद्योग,वस्त्रोद्योग निर्माण करून देण्याची गरज आहे. काश्मीरमधील सध्याचे नेते स्थानिक प्रश्नांचा वापर राजकारणासाठी, एकमेकांना कमी लेखण्यासाठी करीत आहेत. अशीही त्यांनी खंत व्यक्त केली.

द्राक्षवाढीसाठी धोरण हवे

महाराष्ट्र हे देशातील द्राक्ष पिकवणारे प्रथम क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्रात द्राक्षाखाली सुमारे एक लक्ष एकर क्षेत्र असून वार्षिक उत्पादन आठ लाख टनांच्या आसपास आहे. या द्राक्षापासून उत्पादकांना सुमारे आठशे कोटी रूपयांचे उत्पन्न मिळते. सध्याच्या एकूण उत्पादनापैकी मोठा हिस्सा देशांगर्तगत खाण्यासाठी विकला जातो. अलिकडे द्राक्षांची निर्यात, द्राक्षापासून बेदाणा निर्मिती आणि द्राक्षापासून मद्यनिर्मिती यासाठी द्राक्षाचा वापर वाढत आहे.

राज्यातील पश्चिम महाराष्ट्रात द्राक्षाची सर्वाधिक लागवड होते. त्यात या विभागातील गोदावरी, भीमा आणि कृष्णा खोऱ्यातील भूभागाचा समावेश होतो. एकूण तालुक्यांक द्राक्ष लागवड आहे. इतर पिकांच्या तुलनेने द्राक्षावर संशोधन अधिक झाले असून त्यात महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा वाटा मोठा आहे. अलीकडे मात्र द्राक्षावरील संशोधनाची जबाबदारी एनआरसी द्राक्षे मांजरी, या संस्थेवर टाकण्यात आली आहे. एकूण परिस्थिती संधीदायी असून आताच काही निर्णायक स्वरूपाचे पाऊल उचलले तर निराश होणार नाही. गरजेनुसार आणि जागतिक परिस्थितीचा विचार करून यात दर पाच वर्षांनी योग्य ते फेरबदल करण्यात यावेत. पहिल्या व सरत्या पंचवार्षिक कालखंडात दरवर्षी लाख टन द्राक्षाची निर्यात होणे उद्दीष्ट ठेवल्यास त्याची पुर्तता ६६ टक्के गोदावरी खोऱ्यात आणि ३३ टक्के भीमा खोऱ्यात व्हायला हवी होती. म्हणजेच ६००० कंटेनर्स फक्त नाशिनधून उत्पादन निर्यात व्हायला हवे. आतापर्यंत हा कार्यक्रम राबविला गेला नाही. तरी तो पुढील काळात म्हणजे सन २०११ मधील हंगामापासून राबविता येईल. महाराष्ट्रात द्राक्षासाठी रूट स्टॉक आवश्यक असल्याचे सर्वांना उशिरा समजले.

आर्थिक सुधारणांची पुनर्रचना हवी

दिल्ली (वृत्तसंस्था) : आर्थिक सुधारणांचे पुरस्कर्ते प्रा. सुरजीत भल्ला यांच्या मते २०१० सालापर्यंत गरिबी १५ टक्क्यावर आणण्याचे लक्ष्य सन २०१० सालांत गाठले आहे. याचा अर्थ २०१० मध्ये गरिबी रेषेखाली संख्या १५ टक्क्यांवर आली आहे. पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार ल रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. सी. रंगराजन यांच्या मते विकास दर काही वर्षे नऊ टक्क्यांवर राहिल्यास बेकारीची समस्या २००८ मध्ये सुटली असती. ही पाहणी वस्तुस्थितीला धरून नाही. त्यात सत्याचा अभाव आहे. १९५६ सालापासून ३०- ३५ वर्षांची परमिट कोटा यात फसलेली आर्थिक निती, शेतीकडे अक्षम्य दुर्लक्ष करणारे, खेड्यापाड्यांना सापत्न भावाची वागणूक देणारे आर्थिक धोरण बदलण्याची गरज होतीच. अवजड व मोठ्या उद्योगांना प्रोत्साहन देणाऱ्या भांडवली अर्थनीतीची जागा श्रमप्रधान उद्योगांनी घेणे आवश्यक होते. सामान्य माणसांच्या गरजा, जनतेची मानसिकता, पारंपारिक ज्ञानाच्या आधारावर, स्थल, कालाला उचित आर्थिक रचना व सुधारणा करणे अगत्याचे होते. जागतिक अर्थव्यवस्थेतील बदलांचा विचार करून आपली बलस्थाने व जीवनशैलीला पोषक अशी रचना सावधपणे झाली नाही. शेतीवरील ४० कोटी जनतेचा अतिरिक्त भार कमी करण्याचा विचारच झाला नाही. असंघटित क्षेत्रातील ४० कोटी कामगारांना आर्थिक सुधारणांनी स्पर्श केला नाही. गोदामात आणि शेतावर धान्य सडत आहे, पण गरिबीची थाळी रिकामीच आहे. पंतप्रधान, अर्थमंत्री, नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष, कृषिमंत्री पावसाच्या भरवशावर आणि आगामी काळाच्या सुगीच्या भवितव्यावर अवलंबून जीवनाश्यक वस्तूंच्या किमती नजीकच्या काळात आटोक्यात आणण्याचे भविष्य वर्तवीत आहेत. तीन साडे तीन महिने पाणी मिळाले वा दोन आठवड्यांची कडाक्याची थंडी पडली तर तांदूळ, गव्हाचे भरघोस पीक येईल हे सांगण्याकरिता अर्थशास्त्री नको. खनिज तेलाचे भाव आवाक्यात राहिले तर उद्योगांना उठाव मिळेल, हे सांगायला नियोजन मंडळाची किंवा फिकी – ॲसोचॅमची जरूरी नाही. बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेत संपत्तीचे समान वितरण किंवा सर्वसमावेशक विकासाचा विचार होऊच शकत नाही. आर्थिक सुधारणांचे ते अंग असूच शकत नाही. आम आदमीला आपण फसविले जात आहोत, नागविले जात आहोत याची जाणीव झाली आहे. आर्थिक सुधारणांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. उपभोग्य वस्तूंची वाढ आणि वितरण म्हणजे बाजारपेठ विकास. उपभोग्य वस्तूंच्या विनिमय बाजारपेठेत होते. बाजार मागणी निर्माण करतो, गरजा निर्माण करतो, वाढवितो, जीवनशैली बदलतो. प्रतिष्ठिपणाच्या कल्पना रूजवितो. बाजाराला अनूकूल अशा चंगळवादी मनोरचनेला आणि समाजरचनेला हात घालतो. अर्थव्यवस्थेवरील संस्थागत नियंत्रण संपते.बाजार किमती ठरवतो. टंचाई उत्पन्न करतो. बाजारपेठ वसाहतवादाचा प्रसार करते. ही काल परवाची गोष्ट आपण विसरलो नाही रोटी, कपडा, मकान, या किमान आवश्यकतांकरिता आयुष्यभर झगडणारा मजूर हा बाजारपेठेचा हिस्सा, ग्राहक होऊ शकत नाही. शेती व खते, रेशनिंग यावरील सबसिडी कमी करणे, हे नवीन आर्थिक सुधारणांचे अविभाज्य अंग आहे. अनिर्बंध स्पर्धा हे प्रकटीकरण आहे.

'दत्त'च्या सभेवर स्वाभिमानीचा बहिष्कार

जयसिंगपूर (प्रतिनिधी): दत्त सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या गतवर्षीच्या उसबिलातून अन्यायी प्रतिटन ४० रुपये कपात केली आहे. याबाबत साखर आयुक्तांनी ४० रूपये त्वरीत देण्याचा आदेश दिला असतानाही साखर कारखान्याने अद्याप प्रतिटन कपातीचे ४० रूपये परत केले नाहीत. या घटनेचा निषेध म्हणून आज होणाऱ्या साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने बहिष्कार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अण्णासो चौगुले यांनी दिली. तसेच कारखान्याच्याविरोधातील सुरू असलेला न्यायालयीन लढा अधिक तीव्र केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, २००९ व १० च्या सर्वसाधारण सभेत अन्यायी कपात केली. यावर खासदार राजू शेट्टी यांनी या गोष्टीला तीव्र विरोध दर्शवित साखर आयुक्तांकडे तक्रार दाखल केली. साखर आयुक्तांनी शेतकऱ्यांच्या अन्यायी कपातीचे ४० रूपये त्वरीत परत द्या, असा आदेश काढलेला आहे. तरीही दत्त प्रशासनाने शेतकऱ्यांचे पैसे परत दिलेले नाहीत. 'दत्त' कारखान्याच्या व्यवस्थापनाच्या बाबतीत आजवरचा आमचा अनुभव चांगला नाही. दत्त सोयामिल, दत्त भांडार, पेपर मिल, कामगार सोसायटी, शिरोळ तालुका कॉंबडी पालन संघ, शिरोळ तालुका खरेदी विक्री संघ या संस्थांना साखर कारखान्याच्या पैशातून वारंवार मदत झाली पण या संस्था कधीच सक्षमपणे उभ्या राहिल्या नाहीत. त्यामध्ये गुंतवलेले शेतकऱ्यांचे सभासदांचे पैसे मात्र वाया गेले. 'दत्त' च्या कामगारांनी आपल्या सोसायटीतून प्रिंटींग प्रेस काढली पण ती ही लोट्यात चालली व कर्ज कामगारांच्या लोकांवर बसले. दत्त सोया, दत्त भांडार यामध्ये कामगारांचे, शेतकऱ्यांचे वाहनधारकांचे पैसे गुंतवले. परत कधीच मिळालेले नाहीत. पेपर मिल बंद पडली. तोटा शेतकऱ्यांना भरून काढावा लागला. कारखान्याभोवती लावलेल्या नारळाच्या व गुलाबाच्या बागेतून जास्त दर मिळणार होता . पण तो कधीच मिळालेला नाही. कारखान्याच्या परिसरामध्ये एक सुसज्ज ग्रीन हाऊस उभे राहिले, आणि तोट्यात चालवून बंद ही पाडले. आपले वैयक्तीक ग्रीनहाऊस मात्र नफ्यात कसे आले. याचे कोडे सभासदांना अजूनही उलगडले नाही, आणि म्हणून कारखान्याची जमिन ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाचा पैसा परस्पर कापून घेऊन तंत्रनिकेतनास स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा तीव्र विरोध आहे. यावेळी उल्हास पाटील, महादेवराव धनवडे, जि. प. सदस्य प्रकाश परीट, सावकर मादनाईक, आदिनाथ हेमगिरे, के. आर. चव्हाण, दशरथ घाटगे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बहुपीकभक्षी पाने खाणारी अळी

ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची सोय असते, असे शेतकरी एका मुख्य पिकासोबत अनेक पिकांची लागवड करतात. त्याचप्रमाणे वर्षभर पीक ही एक पद्धतही शेतकऱ्यांकडे रूढ होत आहे. अशा वेळी अनेक किडींनीही आपला जीवनक्रम बदलला आहे. एकच कीड अनेक पिकांवर आढळते.

सोयाबीन पिकाखालील क्षेत्र वाढल्याने स्पोडोप्टेरा लिटुरा या बहुपीकभक्षी पाने खाणाऱ्या अळीचा उद्रेक होऊन पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. ही अळी कोबी, फ्लॉवर, भेंडी, कपाशी, एरंडी, बटाटा, झेंडू, शर्कराकंद आदी पिकांवर उपजीविका करते.

जीवनक्रम : मादी पतंग शेतात मोजक्या झाडांच्या पानाखाली २५०-३०० च्या पुंजक्यात अंडी घालते. अंड्यातून तीन ते चारच दिवसांत अळ्या बाहेर पडतात व त्याच पानावर चार ते सात दिवस पानाचे हरितद्रव्य खाताना आढळतात. त्यामुळे पाने जाळीदार काळ्या रंगाची दिसतात. नंतर तीन-चार दिवसांच्या अंतराने छोटे छोटे गट करून सर्व शेतात पसरून अळ्या जसजशा मोठ्या होतात, तशा खादाड होऊन पानांचे अतोनात नुकसान करतात. २५ टक्क्यांपेक्षा जास्त पाने खाल्ल्याने पिकाची वाढ व उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो. अळ्या दिवसा झाडांच्या फांद्या, पालापाचोळा व गवतात लपतात व रात्री अधाशासारख्या पाने खातात. दोन ते तीन आठवड्यांत जमिनीत शिरून कोषावस्थेत जातात. कोषातून सात ते दहा दिवसांत नर-मादी पतंग बाहेर पडून त्यांचे मिलन झाल्यावर मादी अंडी घालण्यासाठी ३० ते ५० दिवसांचे पीक शोधते आणि उद्रेकाचे काळात अळ्या एका शेतातून दुसऱ्या शेतात पसरतात. किडीस पोषक हवामान व उद्रेकाची कारणे म्हणजे कमी ते मध्यम पावसानंतरचा कोरडा काळ, तापमान ३० अंश सेल्सिअसच्या आसपास, रासायनिक कीटकनाशकाचा कीड नसताना वापर, सुरवातीच्या अवस्थेत शेतात कीड उपद्रवावर निरीक्षणांचा अभाव,

दृष्टिक्षेपात

- पर्यावरण संवर्धन
- भूमिपुत्रांना रोजगार
- पडीक जमिनी लागवडीखाली
- पर्यटन व्यवसायाला गती
- अनुदानावरील व्यावसायिक पिकांची लागवड

आब्यांचे उत्पादन व विक्री व्यवस्थापन

हापूस आंबा ही महाराष्ट्रातील महत्त्वाची जात आहे. परंतु याची उत्पादकता फारच कमी आहे. म्हणून आंब्याचे उत्पादन वाढविण्यासाठी चांगली लागवड पध्दत, पाण्याचा व खताचा योग्य पुरवठा, कलमाची छाटणी रोग आणि किडीचे वेळेवर नियंत्रण याकडे फार लक्ष दिले गेले पाहिजे. भारतीय बाजार पेठेत असो किंवा परदेशातील बाजार पेठेत, फळाची हाताळणी जलद आणि शास्त्रोक्त पध्दतीने होणे गरजेचे आहे. त्याकरिता पॅकिंग हाऊसचे अवलंबन होणे जरूरीचे आहे. यात फ्री कुर्लींग, फळे धुणे, फळांना गरम पाण्याची क्रिया, फळांची वर्गवारी, प्रतवारी शीतगृहात साठवणे, पॅकिंग इ. फार महत्वाचे आहे.

१) आंबातोडणी व काळजी: आंबा झाडावरून उतरविण्यासाठी सुधारित झेला वापरावेत, त्यामुळे फांद्या मोडत नाहीत. आंबा तोडताना खालील गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. – आंबा तयार होण्यास ११० ते १२० दिवस लागतात, आणि सर्व आंबा एकचवेळी तयार होत नाहीत. म्हणून झाडावरील आंबे जसे जसे तयार होतील तसे तसे ३ – ४ वेळा तोडावेत. पूण तयार झालेले आंबे न तोडता योग्य तयारीचे आंबे तोडावेत. देठासहित आंबे तोडल्यास फळ २– ३ दिवस अधिक टिकतात. पिकलेल्या आंब्यावर चिकाचे डाग पडले तर फळांना बाजारात चांगला भाव मिळत नाही. म्हणून आंबा देठासहीत तोडू नयेत. आंबा तोडताना प्रत्येक आंबा स्वतंत्र पणे काढावा आणि हळूवार टोपलीत ठेवावे. आंबे काढल्यानंतर पॅकिंग करेपर्यंत उन्हात राहणार नाहीत याची काळजी घ्यावी.

२) **आंब्याची साठवण करताना घ्यावयाची काळजी** : अ) आढी घालणेः आंबा बंदिस्त खोलीत जमिनीवर गवताचा थर टाकून त्यावर आंबे पसरावीत. पुन्हा गवताचा थर द्यावा. शक्यतो ७ – ८ दिवस आंबे हलवू नयेत. त्यामुळे आंबे लवकर पिकतात. आढी घातलेल्या बंदीस्त खोलीत उष्णता व वारा खेळता रहावा. आढी घालण्यापूर्वी सर्व फळे ५५ अंश सेंटीग्रेड तपमानाच्या पाण्यात ५ मिनीट बुडवावीत. तसेच फळे आकर्षित व टवटवीत राहण्यासाठी ०.०५टक्के बेनलेट व थायवे न्डॉझॉल ०.०१टक्का रसायनात ती फळे ५ मिनीटे बुडवून घ्यावीत.

ब) शित तपमानात फळे साठविणेः आंबे बाजारात जास्त काळ उपलब्ध व्हावीत, व दीर्घकाळ टिकवण्यासाठी शीतगृहात फळे वाढून योग्य भावात विकता येतात. शितगृहात १२.५ अंश सेल्सिअस ते १३.५ सेल्सिअस तपमानात ५– ६ आठवडे साठविता येतात.

क) नियंत्रित हवामानात शितगृहात फळे साठविणे : आंबे हवा बंद आवरणात व विशिष्ट प्रमाणात कार्बनडाय ऑक्साईड व प्राणवायु यांचे ५:५ टक्के तर १३ अंश सेल्सिअस तपमान चांगले ठरलेले आहे. आंबा जास्त काळ टिकून राहण्यासाठी मेणाच्या आवरणात बुडवून साठविल्यास फळ आकर्षक दिसतात आणि फळे जादा वेळ टिकतात असे सिध्द झाले आहे.

३) आंब्याची प्रतवारी: बाजारपेठेत चांगला भाव मिळविण्यासाठी प्रतवारी करणे आवश्यक आहे. डागी आंबे निवडून वेगळे काढावेत. आणि ते प्रक्रियासाठी द्यावेत. चांगला मार्केठ मिळण्यासाठी कोवळे आंबे वेगळे काढण्यासाठी साध्या पाण्यात टाकावेत. जे आंबे तरंगतात ते कोवळे असे समजावित. आंबे वजनानुसार प्रतवारी करणे आवश्यक आहे. त्यामुळे बाजारात उत्तम भाव मिळतो.

४) पॅकिंग करणे: वर्गवारी केलेले आंबे २,३,४ डझन क्षमतेच्या आकर्षक पुठ्ठ्याच्या खोक्यात पॅक करावेत. या खोक्यांना बाजूला २ – २ छिद्रे पाडावीत. खोक्यावर आंब्याची जात, नाव, फळाची संख्या, वजन, भरलेली कारीख वगैरे लिहावे.

५) साठवणूक व वाहतूक : हापूस आंबा भरलेली खोकी पेलेटाईझींग करून फ्री कुर्लींग शितकरण यंत्रामध्ये सुमारे अडीच ते तीन तास शितकरण करावेत. परदेशात सर्व प्रकराच्या फळासाठी पॅकिंग हाऊस सुविधेचा वापर करतात. त्यामुळे विक्रीसाठी उत्तम तऱ्हेचे फळ मिळतात. आणि फळ फ्रिकुर्लींग पासून पॅकिंग व पुन्हा शितगृहात साठवणूवक इ. स्वयंचलित यंत्राव्दारे होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळतो. त्याकरीता खासगी अथवा सहकारी तत्वावर मोठी आणि छोटी यंत्रे आयात करून फळाची हाताळणी करणे काळाजी गरज आहे. म्हणजे याच फळांना बाजारात चांगला भाव मिळू शकतो, हे नक्कीच.

पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५